नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. २५ जून २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### अपघात प्रवण घाट रस्त्यांवर पोलिस गस्त, रुग्णवाहिका

मुंबई (स. गांवकरी) : आंबेनळी घाटात स्कॉर्पिओ गाडी दरीत कोसळून झालेल्या अपघाताची घटना २४ तासांनंतर उघडकीस आली. असा प्रकार पुन्हा होऊ नये आणि अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळावी म्हणून आंबेनळी घाटासह राज्यातील प्रमुख घाट रस्त्यांवर पोलिसांकडून २४ तास गस्त घातली जाईल. घाटाच्या परिसरात १०८ रुग्णवाहिका तैनात ठेवली जाईल, अशी घोषणा बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी केली. विधानसभेत अमिन पटेल यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे आंबेनळी घाटातील अपघाताची घटना उपस्थितीत केली होती. घाटात २५ मे रोजी स्कॉर्पिओला झालेल्या अपघतात आठ जणांचा मृत्यू झाला होता. ही घटना २४ तासांनंतर उघडकीस आली. मृतदेह कित्येक तास जागीच पडून होते. जखमींना वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत. त्यामुळे आंबेनळी घाटातील रस्ता रुंदीकरण, संरक्षक कठड्यांचे काम कधी पूर्ण करणार आहात. घाट रस्त्यांवर सुरक्षेच्या साधनांसह आपत्कालीन यंत्रणा तैनात ठेवण्याविषयी सरकार काय निर्णय घेणार आहे, असा प्रश्न पटेल यांच्यासह सुधीर मुनगंटीवार, सुनील प्रभू, अस्लम शेख आदींनी उपस्थितीत केला होता.

### अण्णा असमाधानी; उपोषणावर ठाम

अहिल्यानगर (स. गांवकरी) : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे व राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्यामधील चर्चा आज, बुधवारी फिसकटली. या चर्चेबद्दल आपण असमाधानी असून पुन्हा एकदा राज्य सरकारची चर्चा करू अन्यथा ५ जुलैला आपण उपोषणावर ठाम असल्याचे हजारे यांनी सांगितले. माहिती अधिकार कायद्यात राज्य सरकारने केलेल्या मनमानी दुरुस्त्यांविरोधात तसेच जनहिताच्या या कायद्याची कमकुवत केली जात असलेली पकड या विरोधात ज्येष्ठ समाजसेवक हजारे यांनी ५ जुलैला उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाच पानी निवेदन पाठवले आहे. या निवेदनात त्यांनी सुधारित नियम कसे अयोग्य आहेत, याचे विवेचन केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी हजारे यांना चर्चेसाठी वेळ मागितली होती. पांडे यांच्यासह पुणे विभागीय माहिती आयुक्त मकरंद रानडे, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर, सामाजिक कार्यकर्ते दत्ता अवारी, ॲड. श्याम असावा, तहसीलदार गायत्री सौंदाणे, दादा पठारे आदी राळेगणसिद्धी (ता. पारनेर) येथील बैठकीसाठी उपस्थित होते.

### स्वतंत्र इ स्पोर्ट्स धोरण तयार करणार

मुंबई (स. गांवकरी) : राज्य शासनाचे स्थानिक मातीतील खेळांना प्राधान्य देण्याचे धोरण आहे मात्र बदलत्या काळानुसार लवकरच इ स्पोर्ट्स साठी स्वतंत्र असे धोरण राबवले जाईल, अशी ग्वाही महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत दिली. ऑनलाइन खेळ आणि इ स्पोर्ट्स यांच्या मध्ये एक बारीक रेषेप्रमाणे फरक आहे. नवीन धोरण तयार करताना ते पाहिले जाईल. एकीकडे आपण ऑनलाईन खेळा वर मर्यादा आणण्याचा ठरवत आहोत. तरुणांचा जास्त वेळ स्क्रीन वापरा वर जात आहे. तो कसा कमी होईल त्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. तो या धोरणात अधोरेखित केला जाईल. असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र हे देशातील प्रगत आयटी, डिजिटल आणि स्टार्टअप राज्य आहे. जगामध्ये सध्या इ स्पोर्ट्स ला फार महत्त्व आलेले असून त्याचे कोट्यवधी डॉलरचे उद्योग क्षेत्र बनले आहे.

# वारीत भाविकांची गैरसोय होणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासन सज्ज

- आषाढी वारीसाठी सर्व विभागांकडून सुविधांची व्यापक तयारी
- डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहनीद्वारे वारी सोहळा पोहचणार जगभर



मुंबई : (स. गांवकरी)

आषाढी वारी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वपूर्ण सोहळा आहे. यंदाच्या वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणारं नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पालखी सोहळा प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला असून यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारण्यात आले असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच इतर पालख्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत. वारी सोहळा हा पारंपरिक पद्धतीनेच साजरा करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्याचा सकारात्मक विचार केला जाईल असे ही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले."आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्याव्यात. यंदाची वारी अधिक सुरक्षित, सुकर आणि संस्मरणीय करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, पालखी सोहळा प्रमुखांनी ज्या ज्या मागण्या केल्या होत्या त्याप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष सुरक्षितता घेतली आहे. वारकरी आणि भक्तांची काळजी घेत हा सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे आवाहनही यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

# तुकाराम मुंढेंची बदली होणार नाही

## मंत्री झिरवाळांची सर्वपक्षीय आमदारांना ग्वाही

मुंबई : (स. गांवकरी)



अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कामाचे कौतुक करण्यासाठी बुधवारी सर्वपक्षीय सदस्य एकवटले. आजवर विभागाला अनेक आयुक्त मिळाले. पण, असे काम कुणीच केले नाही. त्यामुळे मुंढेंची तीन वर्षे बदली करू नका, अशी आग्रही मागणीही सर्वपक्षीय सदस्यांनी केली. संत तुकाराम आणि संत नरहरी सोनार हे वारकरी सांप्रदायातील गुरुबंधू होते, वंदनीय सहयात्री होते. आता आयुक्त तुकाराम आणि मंत्री नरहरी यांनी सहयात्री होऊन भेसळ रोखावी, अशी मागणी सुधीर मुनगंटीवार यांनी केली. एफडीला चर्चे आणणारे आयुक्त तुकाराम मुंढे यांचे मनापासून कौतुक करतो, त्यांची काळजी घ्या. त्यांच्या बदलीसाठी तुम्ही प्रयत्न करीत नाही, म्हणून तुमचेही अभिनंदन करतो. भेसळखोरांवर केलेल्या कठोर कारवाईमुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. समाज माध्यमांवरून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. त्यांना संरक्षण द्या. त्यांची तीन वर्षे त्यांची बदली करू नका, अशी मागणी जितेंद्र आव्हाड यांनी केली. मुंढे यांना मनापासून आभार व्यक्त करतो. अनेक खाद्य पदार्थांच्या भेसळीवर कारवाई सुरू आहे. त्यांचे पथक अत्यंत वेगाने काम करीत आहे. विभागाला मंजूर निधी पूर्ण मिळावा, अशी मागणी आम्ही विरोधी बाकावर असूनही मुख्यमंत्र्यांकडे करू, असे नाना पटोले म्हणाले. लहान मुलांना कर्करोग होत आहे. तुकाराम मुंढे यांच्या कामाच्या धडाडीमुळे हे खाते पहिल्यांदा चर्चेत आले आहे. राज्याच्या अनेक भागांत गुटखा बंद झाला आहे. मुंढे यांनी जे केले ते त्यापूर्वीच्या अधिकाऱ्यांनी का केले नाही. मागील अधिकाऱ्यांची चौकशी करा, अशी मागणी अर्जुन खोतकर यांनी केली.

### मुंढे आणि झिरवाळ यांचे समन्वयाने काम

मुंढे आणि झिरवाळ यांनी समन्वयाने काम सुरू केल्यामुळे एफडीए चर्चेत आले आहे. जिथे कारवाई करतो, तो पुन्हा पुन्हा सापडतो, त्यावर ठोस कारवाई होत नाही, असे सुनील शेळके यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर संबंधितांचे परवाने कायमस्वरुपी रद्द करणार असल्याचे झिरवाळ यांनी सांगितले.

# सहा अभ्यासक्रमांसाठी ५३ हजार विद्यार्थ्यांनी केली नोंदणी

मुंबई : (स. गांवकरी)

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे बीपीएड, एमपीएड, ३ व ५ वर्षीय एलएलबी, एमएड व बीएड-एमएड (३ वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रम) या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. या सहा अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी केंद्रीभूत फेरीसाठी आतापर्यंत ५३ हजार १७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. सीईटी दिलेल्या विद्यार्थ्यांनी तातडीने नोंदणी करावी, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे. सीईटी कक्षाकडून सहा अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नोंदणी सुरू झालेल्या अभ्यासक्रमांमध्ये तीन वर्षीय एलएलबी अभ्यासक्रमासाठी ३६ हजार ३९५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या अभ्यासक्रमासाठी ६९ हजार ४७३ विद्यार्थ्यांनी सीईटी दिली होती. बीपीएड अभ्यासक्रमाची सीईटी ४ हजार



९६५ विद्यार्थ्यांनी दिली असून त्यातील २ हजार ६३४ विद्यार्थांनी नोंदणी केली आहे. तसेच एमपीएडसाठी २ हजार १३४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील १ हजार ५७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. बीपीएड, एमपीएड व ३ वर्षीय एलएलबी या तिन्ही अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेशाच्या नोंदणीला ११ जूनपासून सुरुवात झाली असून विद्यार्थ्यांना ३० जूनपर्यंत नोंदणी करता येणार आहे. त्याचबरोबर एमएडसाठी ३ हजार ४५१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील आतापर्यंत १ हजार १९२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

# 'केतन अग्रवाल हत्या प्रकरण भयंकर!

पुणे : (स. गांवकरी)

सिया गोयल या २० वर्षांच्या तरुणीने तिचा होणारा नवरा केतन अग्रवाल याची १८ जूनला लोहगडावरुन ढकलून देत हत्या केली. सियाला केतनशी लग्न करायचं नव्हतं त्यामुळे तिने हे धक्कादायक पाऊल उचललं. सिया गोयलचं चेतन चौधरी या तरुणावर प्रेम होतं. त्याच्या साथीनेच सियाने केतन अग्रवालला संपवलं आणि केतन सेल्फी काढताना पडला आणि मृत झाला असा बनाव रचला होता. पण सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पैलू तपासल्यानंतर हा अपघात नसून हत्या आहे हे समोर आलं. या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला आहे. तर नेटकरीही या प्रकरणी विविध प्रकारे प्रतिक्रिया देत आहेत. पोलीस तपासात सिया आणि चेतन या दोघांनी मिळून केतनची हत्या केल्याचे निष्पन्न झाले असले, तरी कड्यावरून केतनला नेमका धक्का कोणी दिला, याचा थांगपत्ता पोलिसांना अद्याप लागलेला नाही. घटनेच्या वेळी केतनच्या अगदी जवळ सिया होती.

# तुकाराम मुंढे यांची अखेर उचलबांगडी

मुंबई : (स. गांवकरी)

गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून काम करताना राज्यभरात भेसळी विरोधात कठोर मोहिम राबवून अनेकांना धडकी भरविणारे तुकाराम मुंडे यांची राज्य सरकारने महत्वाच्या पदावरुन उचलबांगडी केली आहे. मुंढे यांना महत्वाच्या पदावरुन हटविण्यात आले असून त्यांच्या जागी डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य सरकारने काही दिवसांपूर्वीच तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. सुरुवातीस आयुक्तपद हे कमी दर्जाचे असून सरकारने आपला अवमान केल्याचे सांगत या पदावर रुजू होण्यास मुंढे ना खूश होते. मात्र राज्य सरकारने त्यांची अन्य पदावर नियुक्तीची विनंती फेटाळल्यानंतर मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारताच धडक कारवाई सुरु केली आहे. मुंढे यांनी गेल्या पंधरा- वीस



दिवसात भेसळीविरोधात धडक मोहिम राबविली असून अन्न, औषधे, दूध, खवा भेसळ करणाऱ्यांवर कठोर कावाईचा बडगा उगारत अनेकांना जेलमध्ये पाठविले आहे. एवढेच नव्हे तर काही मोठ्या कंपन्या, उद्योग, हॉटेलवरही मुंढे यांनी कारवाई करीत आपल्या कामाची चूनूक दाखविली आहे.

मुंढे यांच्यावर मनमानी कारभाराचा आरोप करीत त्यांची बदली करण्यासाठी काही नाराज मंडळी प्रयत्नशील असतानाच राज्य सरकारने मंगळवारी मुंढे यांना आणखी एक धक्का दिला. राज्य सरकारने प्रत्येक जिल्हयात प्रशासकीय सोयीसाठी पालक सचिवांची नियुक्ती केली आहे. जिल्हयात राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून पालकमंत्र्याच्या साह्यासाठी तसेच जिल्हयातील प्रश्नांची शासन दरबारी सोडवणूक करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात एका सचिवाची पालक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात येते. या प्रथेनुसारच सरकारने तुकाराम मुंढे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असताना त्यांची परभणीचे पालक सचिव म्हणून नियुक्ती केली होती. मात्र मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागातून बदली करण्यात आल्यानंतर मुंढे यांची आता परभणीच्या पालक सचिव पदावरुनही उचलबांगडी करण्यात आली आहे. तर मुंढे यांच्या जागी परभणीचे पालक सचिव म्हणून ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत फुलकुंडवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर अकोला जिल्हा पालक सचिवपदी कृषी सचिव परिमल सिंह यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# अमली पदार्थांची विक्री रोखा; भाजपचे आंदोलन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहरासह जिल्ह्यात सर्रासपणे सुरू असलेल्या अमली पदार्थ विक्री व त्यामुळे तरुण पिढीमध्ये वाढलेली व्यसनाधीनता, त्यातून निर्माण झालेली गुन्हेगारी व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, याकडे लक्ष वेधण्यासाठी सत्ताधारी भाजपनेच आज, बुधवारी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा नेत ठिय्या आंदोलन केले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अमली पदार्थांविरोधात जिल्ह्यात विशेष मोहीम सुरू करण्याचे आश्वासन देऊन संबंधितांवर कठोर कारवाई करू असे सांगितले. मोर्चा पोहचला तेव्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन कार्यालयात उपस्थित नव्हते. त्यामुळे मोर्चेकऱ्यांनी काहीकाळ ठिय्या आंदोलन केले.

भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी 'युवाशक्ती बचाव देश बचाव', 'अमली पदार्थ हद्दपार झालीच पाहिजे' दारूबंदी-हप्तेबंदी झालीच पाहिजे, अशा घोषणा देण्यात आल्या.



शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यावेळी म्हणाले, अमली पदार्थ सहज कोणत्याही टपऱ्यांवर उपलब्ध होत आहेत. त्यातून तरुण पिढी व्यसनाधीन होत चालली आहे. अनेकांनी आत्महत्या केल्या, अनेक कुटुंब उध्वस्त झाली, वाढत्या व्यसनाधीनतेमुळे जिल्ह्याचा 'उडता पंजाब' होतो की काय असा धोका निर्माण झाला आहे. अमली पदार्थांच्या विरोधात जनजागृती करण्यासाठी पोलिसांनी शाळा, महाविद्यालयात बैठका घ्याव्यात, पानटपऱ्या हटवाव्यात, मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमली पदार्थ विरोधात विशेष पथक निर्माण करण्याचे अधिकार दिले आहेत, त्याची अंमलबजावणी जिल्ह्यात करावी. अन्यथा भाजप आणखी तीव्र आंदोलन करेल. प्रसंगी कायदाही हातात घेतला जाईल.

दिलीप भालसिंग म्हणाले, पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे जिल्ह्यात अवैध धंदे व अमली पदार्थांची विक्री जोमात आहे. अवैध धंदे बंद झाले पाहिजेत. मात्र पोलीसच अवैध धंदे करणाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. हे त्वरित थांबले नाही तर भाजप शांत बसणार नाही.

ला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया दानवे, युवा मोर्चाचे अध्यक्ष रुद्रेश अंबाडे, नगरसेवक उदय कराळे, राहुल शिंदे, बाबासाहेब सानप, वैशाली चव्हाण यांची यावेळी भाषणे झाली.

# अन्न व औषध प्रशासन विभागाची अवस्था दयनीय : मंत्री झिरवाळ

मुंबई : (स. गांवकरी)

अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना जिल्हा अथवा मोठ्या शहरांमध्ये बसण्यासाठी कार्यालये नाहीत. मुळात आयुक्तालयाचाच विस्तार करण्याची गरज आहे. अधिकाऱ्यांना छापे टाकायला जाण्यासाठी वाहने नाहीत. राज्यात फक्त तीनच प्रयोगशाळा कार्यरत असून, त्यांची क्षमताही कमी आहे. अत्याधुनिक यंत्रसामुग्री नाही, त्यामुळे विभागाची अवस्था दयनीय आहे, कबुलीच अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली.

सुनील प्रभू, सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर आदींनी लक्षवेधी सूचनेद्वारे विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थितीत केले. सुमारे पन्नास मिनिटे लक्षवेधीवर चर्चा झाली. सर्वसामान्य लोकांच्या आरोग्याशी थेट संबंध असल्याचे सांगत सर्वच सदस्यांनी उपप्रश्न विचारण्याचा आग्रह धरला. विभागातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची ३५० पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३१६ पदे भरलेली असून, ३४ पदे रिक्त आहेत. औषध निरीक्षकांची २०० पदे मंजूर असून, यापैकी १५९ पदे रिक्त आहेत. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची १९७ पदे भरली आहेत. औषध निरीक्षक पदासाठी ४०० कर्मचाऱ्यांची गरज आहे, ही भरती प्रक्रिया एमपीएसीद्वारे सुरू आहे. केंद्र सरकारच्या धोरणानुसार एक हजार अन्न आस्थापनांना एका अधिकाऱ्याची आवश्यकता आहे. त्यानुसार राज्यात १,१०० अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची आणि ४०० औषध निरीक्षकांची आवश्यकता आहे. विभागाकडे आवश्यक पायाभूत सोयी – सुविधा नाहीत, अशी कबुली झिरवाळ यांनी दिली. विभागाच्या स्वतःच्या तीन प्रयोगशाळा आहेत. त्यांची क्षमता कमी आहे, प्रयोगशाळामध्ये अत्याधुनिक यंत्र सामुग्री नाही. सध्या विभाग २२ खासगी प्रयोगशाळांकडून अन्न नमुन्यांची तपासणी करून घेतो. नाशिक, पुणे, नागपूर येथे विभागाची स्वतःची प्रयोगशाळा लवकरच सुरू केली जाईल. रायगड आणि यवतमाळसाठी जागा शोधण्याचे काम सुरू आहे. अधिकाऱ्यांसाठी विभागाकडे स्वतःची अशी वाहने नाहीत.

FDA MAHARASHTRA

## थोडक्यात पण महत्वाचे



### खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचे शिर्डीत उत्स्फूर्त स्वागत!

शिर्डी (स. गांवकरी) : शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचे प्रथमच शिर्डी लोकसभा मतदारसंघात आगमन झाले. यानिमित्ताने शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, अहिल्यानगर जिल्हा संघटक विजयराव काळे पाटील यांच्या निवासस्थानी त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येने शिवसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांच्या आगमनावेळी फटाक्यांची आतषबाजी, घोषणाबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात परिसर दुमदुमून गेला. "खासदार भाऊसाहेब वाकचौरे तुम आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ हैं" अशा घोषणांनी संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अहिल्यानगर जिल्हा संघटक विजयराव काळे पाटील यांनी संघटनात्मक बांधणी मजबूत करत मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांना एकत्र आणले. त्यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्वागत समारंभास विद्यमान तसेच आजी-माजी शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शिवसेनेत प्रवेशानंतर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचे शिर्डीतील हे पहिलेच आगमन असल्याने कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. यावेळी अनेकांनी त्यांचे अभिनंदन करत आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. स्वागत समारंभामुळे शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी राजकीय घडामोडींमध्ये संघटना अधिक सक्षमपणे काम करेल, असा विश्वास उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.




### स्नेह फाऊंडेशन डोंगरगावचा सामाजिक उपक्रम; साहित्य वाटप!

डोंगरगाव (स. गांवकरी) : सामाजिक बांधिलकी जपत स्नेह फाऊंडेशन डोंगरगावच्या वतीने अनाथ, निराधार आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. "सर्वांची साथ आणि मदतीचा हात" ही संकल्पना समोर ठेवत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक विद्यालय तसेच वस्ती शाळेतील होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, शालेय पाठ्यपुस्तके, वॉटर बॅग तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य देण्यात आले. आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. यावेळी स्नेह फाऊंडेशनचे संस्थापक तथा अध्यक्ष मा. श्री. सोमनाथ उगले यांनी सांगितले की, प्रत्येक व्यक्ती समाजाचे काहीतरी देणे लागते. आपण ज्या परिस्थितीत शिक्षण घेतले, त्या परिस्थितीतील अनाथ, निराधार व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीचा हात देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सामाजिक उपक्रमासाठी स्नेह फाऊंडेशनच्या सर्व पदाधिकारी, सदस्य व मित्रपरिवाराने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी अशा सेवाभावी उपक्रमांची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

### ६६ रुग्णांना १ कोटी ७४ लाख रुपयांचे अर्थसाहाय्य

शिर्डी (स. गांवकरी) : शिर्डी लोकसभा मतदारसंघातील गंभीर आजारांनी ग्रस्त ६६ रुग्णांना पंतप्रधान साहाय्यता निधीतून आतापर्यंत १ कोटी ७४ लाख ७ हजार ५०० रुपयांचे आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या अर्थसाहाय्याचा लाभ मिळण्यासाठी संबंधित रुग्ण उपचार घेत असलेले रुग्णालय पंतप्रधान साहाय्यता निधीच्या मान्यताप्राप्त पॅनेलमध्ये समाविष्ट असणे आवश्यक असल्याची माहिती खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली. या अर्थसाहाय्यांतर्गत कोपरगाव तालुक्यातील नऊ रुग्णांना २४ लाख ४७ हजार ५०० रुपये, नेवासा तालुक्यातील १४ रुग्णांना ३८ लाख ५० हजार रुपये, राहता तालुक्यातील आठ रुग्णांना २२ लाख २५ हजार रुपये, संगमनेर तालुक्यातील १५ रुग्णांना ४१ लाख ८८ हजार रुपये, श्रीरामपूर तालुक्यातील १८ रुग्णांना ४१ लाख ३४ हजार ५०० रुपये, अकोले तालुक्यातील एका रुग्णाला २ लाख ६२ हजार ५०० रुपये तसेच पुण्यातील एका रुग्णाला ३ लाख रुपयांचे अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

### मातीबाबत व्यावसायिक व भूमिपुत्र शेतकऱ्यांमध्ये भांडण

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातील चावंड , उसराण व इतर परिसरातील कुकडी नदीपात्रातील माती उचलण्याबाबत व्यावसायिक व शेतकऱ्यांमध्ये सातत्याने ने भांडणे सुरू आहे . याबाबतचा व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. याबाबत संबंधित अधिकारी कधी लक्ष घालणार ? शेतकऱ्यांना संरक्षण मिळणार का ? याबाबत चर्चा आदिवासी भागात सुरू आहे . कुकडी नदीपात्रातील चावंड , उसराण परिसरात शेतकऱ्यांनी व्यावसायिकाला विचारले की नदी मधून किती माती काढली आहे . इथे शेतकऱ्यांची जनावरे चरत आहेत . येथे दादागिरी चालणार नाही , अशी व्यथा शेतकऱ्यांनी मांडली . आमदार आणा नाहीतर कुणी आणा .आम्ही घाबरणार नाही . गावातील सर्व लोक येऊ द्या . माती न्यायची आहे ना कागदपत्रे दाखवा ? अशी मागणी वारंवार शेतकऱ्यांनी व्यावसायिक यांच्याकडे केली. सरपंच व ग्रामसेवक यांनी पत्र दिला असेल तर आम्ही विरोध करणार नाही . आमच्या अंगावर का आला ? येथे शेतकऱ्यांची जनावर चरत आहे अशी विनवणी भूमिपुत्र शेतकऱ्यांनी माती व्यवसायिकाला केली. याबाबत माती व्यवसायिक शेतकऱ्यांना म्हणाला की , माती संदर्भात इरिगेशन कडे बिनधास्त तक्रार करा . ग्रामपंचायत कडे पाणलोट क्षेत्र संदर्भात माहिती आहे. येथील शेतकऱ्यांनी काय करायचे ते करा आम्ही घाबरणार नाही असे माती व्यवसायिकांनी शेतकऱ्यांना सांगितले. कुकडी नदीपात्रातील चावंड , उसराण माती उचलण्याबाबत व्यावसायिक व शेतकऱ्यांमध्ये झालेल्या भांडणामुळे संबंधित अधिकारी काय निर्णय घेतात? शेतकऱ्यांना संरक्षण मिळणार का? याकडे आदिवासी भागात व जुन्नर तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे.

# अकोलेत आंतरराष्ट्रीय एकल महिला दिन उत्साहात साजरा

**महिलांच्या हक्क व सक्षमीकरणावर भर!**

अकोले : (स. गांवकरी)

अकोले नगरपंचायत व साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनानिमित्त अकोले पंचायत समिती सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एकल महिलांच्या समस्या, हक्क, सक्षमीकरण तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोले नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी धनश्री पवार या उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात एकल महिलांसाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले. तसेच आवश्यक कागदपत्रे, प्रमाणपत्रे व विविध शासकीय सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी नगरपंचायतीमार्फत सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती जनाबाई साळवे, नगरसेविका तमन्ना शेख, नगरसेविका शेळके मॅडम,



नगरसेविका श्वेताली रूपवते, माजी नगराध्यक्षा सोनालीताई नाईकवाडी, साऊ एकल महिला समितीच्या प्रतिमा कुलकर्णी, नगरसेवक नवनाथ शेटे, सीडीपीओ केदार नांगरे, बालसंरक्षण अधिकारी आव्हाड, अर्चना एखंडे, गोगरे मॅडम, स्टेट बँक ऑफ इंडियाचे भुजबळ साहेब, वैभव कदम, उमेदचे कुंदन कोरडे, एनयूएलएमचे बाळासाहेब साळवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अकोले नगरपंचायत हद्दीतील मोठ्या संख्येने एकल महिलांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला. उपस्थित महिलांना विविध शासकीय योजना, आर्थिक सक्षमीकरण, स्वावलंबन, बचत गट, सामाजिक सुरक्षा योजना तसेच महिलांचे अधिकार याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे एकल महिलांना नवी दिशा, आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

साऊ एकल महिला समितीच्या सिमा भागवत, नीता शिंदे आणि गीता आवारी यांनी मनोगत व्यक्त करताना एकल महिलांच्या संघर्षमय, स्वाभिमानी आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाची माहिती उपस्थितांसमोर मांडली. त्यांच्या अनुभवांनी उपस्थित महिलांना नवी ऊर्जा, आत्मविश्वास आणि पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिमा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अकोले नगरपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका तसेच साऊ एकल महिला समितीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

## माहिती अधिकार कायद्यातील दुरुस्त्यांविरोधात राळेगणसिद्धीत मंथन

राळेगणसिद्धी : (स. गांवकरी)

केंद्र सरकारने माहिती अधिकार कायद्यात केलेल्या मनमानी दुरुस्त्या आणि त्यामुळे या जनहिताच्या कायद्याची कमकुवत होत चाललेली पकड याविरोधात आता राळेगणसिद्धीतून एल्गार पुकारण्यात आला आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत आज राळेगणसिद्धी येथे माहिती अधिकार क्षेत्रातील प्रमुख अधिकारी आणि तज्ज्ञांची एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्यासह अनेक दिग्गजांनी हजेरी लावली होती. या मंथनानंतर अण्णा हजारे यांनी सरकारला थेट शब्दांत इशारा दिला आहे. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना अण्णा हजारे यांनी सरकारच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "सध्याच्या बैठकीत सरकारकडून कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले



■ मात्र बैठक निष्फळ, अण्णा हजारे आंदोलनावर ठाम

नाही. या कायद्याचा आत्मा जिवंत ठेवायचा असेल, तर तातडीने एक नवी कमिटी नेमणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या कमिटीत माहिती अधिकार कायद्याचा सखोल अभ्यास असणारे आणि जनतेच्या बाजूने विचार करणारे अधिकारी असायला हवेत," असे अण्णांनी ठामपणे सांगितले. माहिती अधिकार कायद्याची गळचेपी कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, असा सज्जड दम अण्णांनी दिला आहे. आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी अण्णा हजारे यांनी सरकारला ५ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे.

## गोमाता सहकारी दूध उत्पादक संस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न

**संस्थेच्या दुध उत्पादकास प्रति लिटर तीन रुपये बोनस व १२ टक्के लाभांश जाहीर**

वडगाव आनंद : (स. गांवकरी)



आळेफाटा येथील गोमाता सहकारी दूध उत्पादक संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संत सावता महाराज मंदिर, आळेफाटा येथे संस्थेचे चेअरमन गणेश मारुती वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरण संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीला संचालक गणेश रामदास देवकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर सुरेश गडगे यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. संस्थेची स्थापना १९९७ साली स्व भीमाजीशेठ गडगे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली असून अल्पावधीतच संस्थेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेने पश्चराईज व होमोनाईज प्लांट उभारणी, "गोमाता दुग्धालय" नावाने दुग्धजन्य पदार्थांची विक्री , दूध विक्री, करण्याकरता स्वतंत्र विभाग आउटलेट सुरू केले आहे दूध विक्रीत वाढ होऊन नफा कसा मिळवता येईल या हेतूने गोमाता ब्रँड रजिस्टर करून छापील दूध पिशवी तयार करून पुणे येथे दूध दुग्धजन्य पदार्थ विक्री सुरू करण्यात आली.सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात संस्थेला लेखापरीक्षणात अ दर्जा मिळाला असल्याची माहिती अहवाल वाचनात संस्थेचे सचिव अभिषेक कोकाटे यांनी दिली. या वार्षिक सर्वसाधारण सभे निमित्त पुणे जिल्हा कात्रज संघाचे नवनिर्वाचित चेअरमन अरुण शेठ चांभारे संचालक बाळासाहेब खिलारी आदी मान्यवरांची तसेच, संस्थेचे सभासद उत्पादक सर्व संचालक मंडळ उपस्थिती होते

संस्थेने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात ११,७३,४९३ लिटर संकलित केलेल्या दुधावरती प्रति लिटर तीन रुपये बोनस देण्याचे सभेमध्ये जाहीर करण्यात आले तसेच संस्थेच्या सभासदांना १२% लाभांश जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेत जास्तीत जास्त दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकांना बक्षीसे देण्यात आली तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचाही कॉफी देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश देवकर यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश वाघमारे केले असून अहवाल वाचन सचिव अभिषेक कोकाटे यांनी सादर केला.

## भर पावसात पारनेरमध्ये शेतकऱ्यांचा जनआक्रोश मोर्चा

**सात-बारा कोरा न झाल्यास मंत्रालयावर धडक, खासदार निलेश लंकेंचा इशारा!**





पारनेर : (स. गांवकरी)

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी पारनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली भर पावसात भव्य 'जनआक्रोश मोर्चा' काढण्यात आला. पारनेर तहसील कार्यालयावर धडकलेल्या या मोर्चात तालुक्यासह परिसरातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

यावेळी शेतकऱ्यांना संपूर्ण व तातडीची कर्जमाफी द्यावी, पीक विमा मिळण्यासाठी लादण्यात आलेल्या जाचक अटी त्वरित रद्द कराव्यात, शेतीमालाला हमीभावासह योग्य दर मिळावा, तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावेत, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. मोर्चाला संबोधित करताना खासदार निलेश लंके यांनी राज्य सरकारवर टीका करत शेतकरी हिताचे निर्णय तातडीने घेण्याची मागणी केली. "राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून त्याला दिलासा देण्यासाठी सरकारने त्वरित पावले उचलली पाहिजेत. शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्यासह कर्जमाफीचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा," असे त्यांनी सांगितले.

सरकारने शेतकरी हिताच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. "वेळेत निर्णय घेतला नाही, तर शेतकऱ्यांना सोबत घेऊन थेट मंत्रालयावर धडक मारू," असा अल्टिमेटम खासदार लंके यांनी सरकारला दिला.

या जनआक्रोश मोर्चामुळे पारनेरमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत तीव्र असंतोष व्यक्त होत असून, सरकारच्या भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संस्काराच्या शिंपल्यातील मोती : साहील गुंजाळची प्रेरणादायी यशोगाथा

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

१४ मार्च २०१८. भर उन्हाळ्याचे दिवस. श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील विद्याधाम प्रशाला परीक्षा केंद्रावर दहावीची परीक्षा सुरू असल्याने शाळा दुपार सत्रात भरली होती. घरची परिस्थिती बेताची असतानाही इयत्ता सहावीत शिकणारा एक विद्यार्थी 'अग्निपंख फाउंडेशन'च्या 'एक मूठ धान्य अनाथांसाठी' या उपक्रमात सहभागी होण्यासाठी पाठीवर दप्तर आणि हातात धान्याची पिशवी घेऊन उन्हाचे चटके सहन करत तब्बल तीन किलोमीटर पायपीट करून शाळेत पोहोचला आणि त्याने आपले धान्य जमा केले. स्वतःची परिस्थिती कितीही कठीण असली तरी अनाथ मुलांसाठी आपण काहीतरी योगदान देऊ शकलो, या समाधानाने त्याने केलेले कष्ट क्षणात विसरले. लहान वयातच समाजसेवेचे संस्कार लाभलेल्या या विद्यार्थ्याने शिक्षणासोबतच खेळ, धावणे आणि घरच्या कामात आई-वडिलांना मदत



करत आपला सर्वांगीण विकास साधला. तो विद्यार्थी म्हणजे साहील तुळशीराम गुंजाळ. शांत, नम्र आणि जिद्दी स्वभावाच्या साहीलने आपल्या मेहनतीच्या जोरावर आज एक महत्त्वाचे यश संपादन केले आहे. भारत मातेची सेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगणारा साहील आता सैन्यदलाच्या खडतर प्रशिक्षणासाठी बेळगाव येथे रवाना होत आहे. साहीलच्या या यशामागे त्याची चिकाटी, कष्ट आणि बालपणापासून मिळालेले संस्कार यांचा मोठा वाटा आहे. त्याची ही वाटचाल अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. साहील तुळशीराम गुंजाळ यास पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

## रोबोटिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रिया अचूक सुरक्षित व परिणामकारक

शिवनेरी : (स. गांवकरी)

■ डॉ. प्रदीप जोशी चेअरपर्सन

रोबोटिका तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रिया अचूक सुरक्षित व परिणामकारक होतात . गुडघ्याची शस्त्रक्रिया रोबोटिका माध्यमातून अचूकता साध्य होत आहे . यामुळे रुग्णांना कमी वेदना व कमी रक्तस्त्राव होतो. असे रोबोटिक तंत्रज्ञान शल्य चिकित्सक भव्य उद्घाटन प्रसंगी डॉ. प्रदीप जोशी चेअरपर्सन मेडिकल प्रोक्टिशनर असोसिएशन यांनी या कार्यक्रमाप्रसंगी सांगितले . डॉ. शिवाजी सोनवणे यांची जिद्द १७ ते १८ तासवैद्यकीय क्षेत्रासाठी सेवा करण्याची तयारी आहे . असे डॉ . जोशी यांनी सांगितले . उत्तर पुणे जिल्हा व बारा तालुक्यांमध्ये सर्वप्रथमच सांधे प्रत्यारोपण करणारा रोबोट जुन्नर तालुक्यात आणला आहे यामुळे रुग्णांना सोय उपलब्ध झाली असे गौरव उद्गार चेअरमन डॉ. मंगेश आमले यांनी काढले . शिवसेना मदत कक्ष सहाय्यता निधी मंगेश दिवटे , पं. स. सदस्य जयसिंग पोटे, माजी पं. स. सदस्य जीवन शिंदे , माजी अप्पर आयुक्त के बी वाघमारे , जि. प. सदस्य मंगेश काकडे , डॉ. प्रशांत काचळे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. वैभव मुरादे , सोपान पवार , भरत कोल्हार , रमेश टाव्हरे, लक्ष्मण शेळके, सुलोचना वाघमारे , तुकाराम दाभाडे, हौसा काळे, दादा चिकणे व इतर सर्व आधुनिक शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांच्या सत्कार याप्रसंगी करण्यात आला . सचिन भोजने , डॉ. मिलिंद कसबे , दिपक काशीद , ज्योती शेलार , मेजर रमेश खरमाळे या मान्यवरांनी पशुपक्षी , बेघर भटकंती मानव , समाजातील नैसर्गिक परिस्थितीमध्ये संकट आल्यानंतर समाज हितासाठी सदैव तत्पर असणारे सचिन भोजने , डॉ. मिलिंद कसबे , दिपक काशीद , ज्योती शेलार , मेजर रमेश खरमाळे समाजसेवकांचा समाजभूषण पुरस्कार देऊन प्रमाणपत्र, ट्रॉफी , शाल , श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.

# प्रणव कवडे सीए परीक्षेत यशस्वी

**समर्थ संकुलात सत्कार**

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेजचा बेल्हेचा माजी विद्यार्थी प्रणव कवडे यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) ही देशातील अत्यंत प्रतिष्ठित व आव्हानात्मक परीक्षा यशस्वी- रित्या उत्तीर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल समर्थ शैक्षणिक संकुलात त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रणव कवडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सीए परीक्षेची तयारी,अभ्यासाचे नियोजन,वेळेचे व्यवस्थापन आणि सातत्यपूर्ण परिश्रम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासा च्या बळावर सातत्याने प्रयत्न करावेत,असा संदेश दिला. तसेच शालेय शिक्षणाच्या



काळात समर्थ संकुलामध्ये मिळालेले संस्कार,शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेने दिलेली प्रेरणा यामुळेच हे यश संपादन करणे शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी प्रणव कवडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांसाठी प्रणव यांचे यश प्रेरणादायी असून त्यांनी केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यास उपयुक्त ठरेल, असे मत प्राचार्या वैशाली आहेर यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, मुक्ताई देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष जानकुशेठ डावखर,बेल्हे गाव च्या सरपंच मनीषा डावखर, ग्रामपंचायत सदस्य किरण गुंजाळ,सुनील कवडे, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी प्रणव कवडे यांचा सत्कार करून त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संगीता रिठे यांनी केले, तर प्रा.संतोष पोटे यांनी आभार प्रदर्शन केले.प्रणव कवडे यांच्या या यशामुळे समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून संपूर्ण संस्थेमध्ये आनंदा चे वातावरण निर्माण झाले आहे.




अकोले तालुक्यातील आदिवासी भागातील समर्थ माध्यमिक विद्यालय मवेशी विद्यार्थ्यांना NKT ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने सतरंजी व घड्याळ विद्यालयाचे महेश सातपुते व अनिल नाईकवाडी यांच्या कडे प्रदान करताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे प्रगतशील शेतकरी शिवाजीराव नाईकवाडी मामा

# एकल महिलांना शासनाच्या योजनांमध्ये प्राधान्य देणार



- गटविकास अधिकारी अमर माने

**देवठाण, ता. अकोले: (स. गांवकरी)**

केंद्र व राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरणाशी संबंधित विविध योजनांचा लाभ एकल व गरजू महिलांना प्राधान्याने देण्यात येईल. तसेच रोजगार हमी योजना, घरकुल, पशुसंवर्धन,समाजकल्याण ,कृषी, महिला व बालविकास विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करतानाही एकल महिलांना विशेष प्राधान्य दिले जाईल,तसेच सर्वच महिलांनि बचत गटात सहभाग घ्यावा आनी उद्योग व्यवसाय सुरू करण्यापासून ते विक्री करेपर्यंत जी काही मदत, माहिती लागेल ती देण्याचे आश्वासन अकोले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमर माने यांनी दिले.

आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त देवठाण येथे ग्रामपंचायत देवठाण आयोजित एकल महिला मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य अरुण शेळके, सरपंच विजया सहाणे, ग्रामपंचायत अधिकारी संजय वाघ, महिला व एकात्मिक बालविकास विभागाच्या पर्यवेक्षिका भनगडे,पद्मा पाटोळे, शीला शेळके, विमल खुळे,सरला येलमामे,हिरा काळे, प्रतीक्षा बोडके ,भागूबाई कातोरे,नंदा जोरवर,वनिता शेळके, संगीता मालुंजकर ,चंद्रकला जोरवर,नंदा मेंगाळ,सुरेखा शेळके,कल्पना निरगुडे, ताराबाई शेळके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मेळाव्याच्या प्रारंभी ग्रामपंचायत व जनसेवा ग्रामविकास मंडळाच्या वतीने देवठाण येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर वृक्षारोपण करण्यात आले. तसेच आरोग्य विभागाच्या वतीने गरजू महिलांना आयुष्मान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. एसएमबीटी डेंटल रुग्णालय, ग्रामपंचायत देवठाण व जनसेवा ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच NCMC बस सेवा कार्ड नोंदणी शिबिराचे ही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात महिलांनी सहभाग घेऊन मोठ्या प्रमाणात नोंदणी केली. यावेळी उपस्थित एकल महिलांनी मुलांचे पालनपोषण, संगोपन, आरोग्यविषयक प्रश्न, कौटुंबिक अडचणी,शासकीय योजना बाबत माहिती तसेच उपजीविकेच्या समस्या मांडल्या.

# रक्तदान शिबिराने वाढदिवस साजरा होणे हे माझे भाग्य : उद्योजक डावरे

- उद्योजक माणिकराव डावरे यांच्या वाढदिवसानिमित्त 145 दात्यांनी केले रक्तदान
- रोटरी क्लब अकोले सेंट्रलचा उपक्रम

**अकोले: (स. गांवकरी)**

रोटरी क्लब अकोले सेंट्रल हे समाजाची गरज ओळखून कार्य करणारी संस्था असून गेल्या चार वर्षांपासून माझ्या वाढ दिवसानिमित्त समाजाची गरज लक्षात घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन करते हे खऱ्या अर्थाने मला दिलेली वाढदिवसाची अनमोल भेट असल्याचे व माझा वाढदिवस रक्तदान शिबिराने साजरा होतोय हे माझे भाग्य असल्याचे प्रतिपादन तालुक्याचे भूमिपुत्र, उद्योजक माणिकराव डावरे यांनी केले.

त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रोटरी क्लब अकोले सेंट्रल च्या वतीने चाकण येथे प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग कंपनी मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब च्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत 145 रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले.

हडपसर(पुणे )येथील अक्षय ब्लड बँक व त्यांचे दीपक देशमुख व त्यांच्या






टीमचे या रक्तदान शिबीरासाठी मोठे सहकार्य लाभले.

यावेळी उद्योजक माणिकराव डावरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी रोटरी क्लब चे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर तथा आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज चे को-ऑर्डिनेटर प्रा.विद्याचंद्र सातपुते, आटोमॅक कंपनी चे सुपरवायझर तुकाराम घोलप,प्रवरा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक तथा रोटरी क्लब चे जेष्ठ सदस्य शांताराम मालुंजकर, उद्योजक नितीनसेठ कड, डॉ. बाळासाहेब ननवरे,संतोषसेठ पवळे, पंडितसेठ कड,किसनसेठ मुरे,चंद्रकांत गायकवाड,भाऊसाहेब घोमल, अजित डावरे,सुधीर डावरे उपस्थित होते. माणिकराव डावरे यांचा शाल,बुके व केक कापून सत्कार करण्यात आला. यावेळी माणिकराव डावरे पुढे म्हणाले की, असे सामाजिक उपक्रम यापुढे मोठ्या स्वरूपात केले जातील.माझें आई वडील हे शिक्षक असल्याने त्यांच्या संस्काराने समाजासाठी सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मला मिळाली. मी केलेल्या मदतीने विद्यार्थ्यांना कसा फायदा झाला हे जेव्हा शिक्षक फोन करून,प्रत्यक्ष भेटून सांगतात त्यावेळी आपले कार्य सार्थकी लागल्याचे समाधान मिळते. रोटरी क्लब हे त्यांच्या उद्दिष्टप्रमाणे काम करताना योग्य संधीचा उपयोग समाजहितासाठी करतात हे कौतुकास्पद आहे. असे मत व्यक्त केले आज माझ्या वाढदिवसानिमित्ताने आपण सर्व स्तरातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.सर्वांनी टीम वर्क ने काम केल्यास निश्चित त्यातून चांगले कार्य घडते.असे मत व्यक्त केले. यावेळी प्रा.विद्याचंद्र सातपुते, तुकाराम घोलप,मुख्याध्यापक शांताराम मालुंजकर,प्रमोद आठल्ये,प्रकाश चव्हाण,विशाल मालुंजकर, आदीनी आपले मनोगत व्यक्त करून उद्योजक माणिकराव डावरे यांचा यशस्वी जीवनाचा,त्यांच्या सामाजिक योगदानाचा आढावा घेतले. प्रास्ताविक किरण थोरात यांनी केले , स्वागत व सूत्रसंचालन पंकज कुंभारे यांनी केले तर आभार अजित डावरे यांनी मानले.कार्यक्रमाच्या

यशस्वीतेसाठी किरण थोरात, मारुती कटीगर,तुषार वाडेकर,विशाल मालुंजकर,आकाश डावरे,अशोक सावंत आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## शिवजन्म भूमी किल्ले शिवनेरीवर आंतरराष्टीय योग दिन उत्साहात संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : महाराष्ट्राचे आराध्य दैवत राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्म स्थानी शिवनेरी किल्ल्यावर योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारता सह जगभरात साजरा करण्यात येणारा १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा झाल्या ची माहिती श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नरचे प्राचार्य डॉ. एम.बी.वाघमारे यांनी दिली. या कार्यक्रमामध्ये ३६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी पुणे चे कमांडिंग ऑफिसर कर्नल निषाद मंगरुळकर,लेफ्टनंट कर्नल हेमचंद्र बी,सुबेदार मेजर रमाकांत सिंह,भारतीय पुरातत्त्व विभाग उपमंडळ जुन्नरचे गोकुळ दाभाडे, सुरेश तारडे, हर्ष कुशवाह,लाभार्थ गुप्ता, शिव छत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी.वाघमारे, एन सीसी विभागाचे प्रमुखडॉ.कॅप्टन बाबासाहेब माने,प्रा. विक्रम रसाळ,प्रा.निलेश आमले,प्रा. रेखा गायकवाड, प्रा.सोनम ताजणे इतर महाविद्यालयातून आलेले कॅप्टन दिलीप शिवणे, लेफ्टनंट निलेश हांडे, लेफ्टनंट शशिकांत भगत,लेफ्टनंट रमेश गावडे,सेकण्ड ऑफिसर रोहित भागवत,सेकण्ड ऑफिसर दत्तात्रय चासकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## भामकाई देवराई प्रकल्पांतर्गत एक हजार पेक्षा जास्त झाडांचे वृक्षारोपण

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : 'भामकाई देवराई' प्रकल्पांतर्गत जुन्नर तालुक्यातील मांदारणे येथे एक हजार पेक्षा ही जास्त झाडे लावण्यात आली. या प्रकल्पासाठी महाराष्ट्रातील अनेक संस्थांनी सहभाग घेतला. वसुंधरा अभियान बाणेर, शिवभूमी सह्याद्री चॅरिटी,ग्रीन व्हिजन फाऊंडेशन व शिवनेरीचे शिलेदार गृप यांचा संयुक्त विद्य माने ह्या उपक्रमाची मुहूर्त मेढ रोवली गेली,पर्यावरणपुरक वृक्ष लागवड करून निसर्ग संवर्धन करण्याचा संकल्प या निमित्ताने सर्व पर्यावरण प्रेमिनी केला,या देवराई प्रकल्पात सर्व देशी झाडांची लागवड करण्यात येणार आहेत,भविष्यात चाळीस एकर पेक्षा जास्त गायरान क्षेत्र ग्रामपंचायत मांदाराने वृक्ष लावगवडीसाठी उपलब्ध करून देणार आहेत. यावेळी बोलताना वनपरीक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी उपक्रमाची प्रशांसा करताना भविष्यात फॉरेस्ट विभागाची जागा देखील या उपक्रमासाठी देण्याची ग्वाही दिली.या प्रसंगी हम है ना.. फाऊंडेशनचा वतीने एक पेड शहिद के नाम या संकल्पने अंतर्गत शहिद जावनांचा नावे काही झाडें लावण्यात आली. या कार्यक्रमासाठी या प्रकल्पाचे उदगाते रमेश डुंबरे,सरपंच सविता ठोसर,संतोष वाळेकर, रवि ढमाले,सुजित नलावडे, कृष्णा सदाकाळ,शिरीष भोर, पोपट नलावडे,विघ्नहरसहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर,मोहित ढमाले, अनिलशेठ तांबे वनपरीक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे, स्नेहल भोर,कॅप्टन भिकाजी भागवत,आकाश डावखरे, मोहन महाकाळ व ग्रामस्थ मांदारने यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## पहिल्याच पावसात राजूर बसस्थानक गळायला सुरुवात!

राजूर (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील महत्त्वाचे केंद्र असलेल्या राजूर बसस्थानकाची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. मान्सूनच्या पहिल्याच पावसात बसस्थानकाचे छत गळायला सुरुवात झाली असून, प्रवाशांना आडोशासाठी देखील जागा उरलेली नाही. बसस्थानकावरील असुविधांबाबत अनेक वेळा बातम्या प्रसारित करून आणि संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना लेखी तक्रारी देऊनही प्रशासनाला अद्याप जाग आलेली नाही. पावसाळा सुरू झाला तरी बसस्थानक परिसरात कोणतीही स्वच्छता नाही, उलट पहिल्याच पावसात संपूर्ण आवारात चिखल आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. बसस्थानकावरील शासकीय शौचालयाची अवस्था नरकयातनांपेक्षा कमी नाही, ते नेहमी अत्यंत घाण असते. धक्कादायक बाब म्हणजे, हे शौचालय चालवणारा कंत्राटदार प्रवाशांकडून बेकायदेशीरपणे आणि मनमानी पद्धतीने पैशांची वसुली करत आहे. शासनाचे कोणतेही अधिकृत दरपत्रक लावलेले नसून, ग्रामीण भागातील सर्वसामान्य प्रवाशांकडून कधी कधी थेट १५ रुपयांची मागणी केली जाते. ग्रामीण भागात नियमानुसार एवढे पैसे घेण्यास पूर्णपणे बंदी असतानाही ही लूट उघडपणे सुरू आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर**
**ई–निविदा सूचना क्रं.०५ सन २०२६–२७**
**दुरध्वनी क्रमांक – ०२४१/२३२५३३४ फॅक्स नं.०२४१/२३२५०८६**
मुख्य संकेतस्थळ – https://mahatenders.gov.in e-mail-ahmednagar.ee@mahapwd.gov.in

**संक्षिप्त ई–निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर (दुरध्वनी क्रमांक ०२४१/ २३२५३३४/ २३२५०८६) हे ता. जामखेड, पारनेर, अ.नगर जि. अहिल्यानगर येथील एकूण (०६) कामांसाठी ब–१ नमुन्यातील मोहरबंद निविदा, ई–निविदा, ई प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रीय कंपनी यांची उपकंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेऊ शकेल (महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पंजीकृत कंत्राटदार असणे आवश्यक नाही.) निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी.तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रु. लक्ष) | अंदाजित रक्कम (अक्षरी) |
|---|---|---|---|
| १ | पारनेर सुपा रोड रामा ६९ ते वडनेर हवेली राळेगण सिद्धी रस्ता प्रजिमा–२१८ किमी ३/८०० ते ११/६०० मध्ये सुधारणा करणे ता.पारनेर | रु.८१७.०० लक्ष | रु.आठ कोटी सतरा लक्ष |
| २ | केडगाव सोनेवाडी अकोळनेर घोसपुरी चिखली रस्ता (प्रजिमा ५४) कि.मी. ४/५०० ते ९/०० मध्ये सुधारणा करणे, ता. अहिल्यानगर | रु.५४०.०० लक्ष | रु.पाच कोटी चाळीस लक्ष |
| ३ | तालुका हद्द श्रीगोंदा मठपिंपरी ते जिल्हा हद्द रस्ता ग्रा मा.५९ कि.मी ४/०० मध्ये (श्री कृष्ण मंदिर महानुभाव आश्रमा जवळ ) सेतू पुलाचे बांधकाम करणे ता.नगर जि.अहिल्यानगर | रु.६४८.०० लक्ष | रु.सहा कोटी अठ्ठेचाळीस लक्ष |
| ४ | दिघोळ मालेवाडी रस्त्यावर ग्रा.मा.२३ कि.मी ३/२००० मोठ्या पुलाचे बांधकाम करणे ता.जामखेड जि.अहिल्यानगर | रु.६१८.०० लक्ष | रु.सहा कोटी अठरा लक्ष मात्र |
| ५ | खारेकर्जुने हिंगणगाव निमगाव वाधा केडगाव वाकोडी वाळूंज रस्ता (प्र.जि.मा. १७०) कि.मी. क्र. १७/२२० ते १९/४०० मध्ये कॉंक्रीटीकरण व सुधारणा करणे.ता.अहिल्यानगर जि.अहिल्यानगर | रु.५६५.०० लक्ष | रु.पाच कोटी पासष्ट लक्ष |
| ६ | पुणे अहिल्यानगर रस्ता (जुना रा.मा. ६०) कि.मी. क्र. ११८/८०० ते ११९/८०० मध्ये कॉंक्रीटीकरण व सुधारणा करणे.ता. जि. अहिल्यानगर | रु.१२१५.०० लक्ष | रु.बारा कोटी पंधरा लक्ष. |

ई–निविदा विक्री कालावधी दि. २५/०६/२०२६ ते ०२/०७/२०२६, १८.०० वा.पर्यंत, निविदा उघडणे दि.०३/०७/२०२६, संध्या.१८.०० वा., कामांची निविदापुर्व बैठक दि. २१/०६/२०२६ रोजी दु.१२.३० वा. मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.वि.नाशिक, यांच्या कार्यालयामध्ये आयोजित केलेली आहे.

सविस्तर निविदा सूचना व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
1. www.mahapwd.com. 2. https://mahatenders.gov.in
सदर ई–निविदा सुचनेमध्ये काही बदल झाल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C1286

**अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर**
महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर.
कार्यालय फोन नंबर - २३२६९१४ Email id :-ahmednagarfederation@gmail.com
जा.क्र.पतसंस्था/फेडरेशन/६०९/२०२६ दिनांक : २३/०६/२०२६

**स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस**
**नमुना 'झेड '**
**(नियम १०७पोट-नियम (११(ड-१)पहा.)**

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी **:- विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.जामखेड,ता.जामखेड.जि.अ.नगर** व्दारा: **अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या,अ.नगर** ,महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे .खाली सही करणा-याने जप्तीची नोटीस दिली असुन ,पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ,ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे.आणि सर्व नागरिकांना ,खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणा-याने त्याला /तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ,१९६१मधील नियम १०७(११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार **दि.२२/०६/२०२६**दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की ,मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करु नये.आणि व्यवहार केल्यास **:- विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.जामखेड,ता.जामखेड.जि.अ.नगर** यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ.न | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटिस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भुमापन क्र. | क्षेत्र हे आर चौ मी | [illegible] | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार - रंगनाथ जयवंता लेकुरवाळे [मयत] करिता<br>वारसदार- भाऊसाहेब रंगनाथ लेकुरवाळे यांची मिळकत | दावा रक्कम रु.४१५८२/- दि.०१/०४/२००३ पासुन १६% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. ०९/१०/२०२० जप्ती नो.दि. २३/०४/२०२६ | हाळगाव ता. जामखेड | १४७ | १.२०.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| २. | कर्जदार - सचिन संतराम हुलगुंडे यांची मिळकत | दावा रक्कम रु.१५८२९०/- दि.०१/०४/२०१३ पासुन १६% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. ३१/१०/२०१८ जप्ती नो.दि. ०७/०२/२०१९ | चुंभळी ता. जामखेड | १५२ | ०.१३ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ३. | कर्जदार - नारायण जगन्नाथ डाडर करिता<br>जामि- सुभाष भानुदास मोरे यांची मिळकत | दावा रक्कम रु.१९०७३२/- दि.३०/११/२०२१ पासुन १८% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. २८/०२/२०२३ जप्ती नो.दि. ०८/११/२०२३ | चुंभळी ता. जामखेड | २२/३ | ०.४३ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ४. | कर्जदार - सुनिता झुंबर अंधारे यांची मिळकत व करिता<br>जामि- भागवत झुंबर अंधारे यांची मिळकत | दावा रक्कम रु.४२५९७२/- दि.१७/१०/२०२० पासुन १८% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. २४/०२/२०२२ जप्ती नो.दि. ०७/०७/२०२३ | जामखेड<br>जामखेड ता. जामखेड | ११८६ पैकी<br>११८६ पैकी | ०.०१.६५ पैकी<br>०.०१.६५ पैकी | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ५. | कर्जदार - पुजा शामराव गायकवाड यांची मिळकत | दावा रक्कम रु.२१३६६९/- दि.०१/०४/२०१७ पासुन १६% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२० जप्ती नो.दि. ०७/०७/२०२३ | जामखेड ता. जामखेड | ११८६ पैकी | ०.०१पैकी | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ६. | कर्जदार - गणेश मधुकर गंभीरे यांची मिळकत व करिता<br>जामि-किरण बाबासाहेब मोरे यांची मिळकत | दावा रक्कम रु.५२११४८/- दि.०१/०४/२०१७ पासुन १५% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. २८/०२/२०२३ जप्ती नो.दि. ३१/१०/२०२३ | रत्नापुर<br>रत्नापुर ता. जामखेड | ४७२<br>५६०<br>५५८/१ | १.११.००<br>०.३८.००<br>१.१६.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ७. | कर्जदार - महादेव अश्राजी मुरुमकर यांची मिळकत | दावा रक्कम रु.१०००००/- दि.२१/०७/२०१७ पासुन १५% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. २१/०५/२०२६ जप्ती नो.दि. ०८/०१/२०२५ | साकत ता. जामखेड | ११९८ पैकी<br>११२७ पैकी | ०.२८ पैकी<br>०.०६ पैकी | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ८. | कर्जदार - आप्पासाहेब काशीनाथ खोसे यांची मिळकत | दावा रक्कम रु.१२१९४०/- दि.०१/०४/२००३ पासुन १८% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. ०९/१०/२०२० जप्ती नो.दि. ३१/१०/२०२३ | गिरवली ता. जामखेड | ४<br>७ | ०.०१<br>०.२० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ९ | कर्जदार - दत्तात्रय अंकुश मोरे यांची मिळकत व करिता<br>जामि-गणेश संजय मोरे यांची मिळकत | दावा रक्कम रु.१४६०९१/- दि.२५/०१/२०२१ पासुन १५% व्याज +इतरखर्च | मागणी नो.दि. २४/०२/२०२२ जप्ती नो.दि. ३१/०१/२०२४ | जामखेड<br>जामखेड ता. जामखेड | १३५४ पैकी<br>१३५४ पैकी | ०.००४३ पैकी<br>०.००४३ पैकी | मुळ नकाशा प्रमाणे | | | |

दिनांक - २३/०६/२०२६
स्थळ-अ.नगर

(सही)
एम.ए.शेख
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी
फेडरेशन मर्या,अ.नगर

# महाराष्ट्रातील २ कोटी विद्यार्थी अभ्यासणार भाऊराया चौधर याचे इयत्ता सहावीचे पाठ्यपुस्तक

**मुरबाड (स. गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे (बालभारती) उपलब्ध करून दिली जाणाऱ्या पाठ्यपुस्तकापैकी काही इयत्तांची पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये बदलली असून त्यातीलच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांना नवीन पाठ्यपुस्तके लागू झाली आहेत.यामधील इयत्ता सहावी चे आपल्या पंचक्रोशीतील निसर्गाच्या सानिध्यात वसलेले ठाणे जिल्हा परिषद शाळा संतेचा पाडा , मानिवली येथे बालभारती लेखक भाऊराया भिमा चौधर हे मुख्य शिक्षक म्हणून



कार्यरत आहेत. लेखक चौधर सरांच्या लेखणीतून इयत्ता सहावी भूगोल विषयाचे पाठ्यपुस्तक साकारलेले आहे. भाऊराया चौधर यांनी वर्षभर बालभारती पुणे वेळोवेळी सभेस उपस्थित राहून तयार केलेले पाठ्यपुस्तक आज महाराष्ट्रातील २ कोटी विद्यार्थी अभ्यासणार आहे. जाणकार, तंत्रस्नेही, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले विद्यार्थी प्रिय आदर्श शिक्षक भाऊराया चौधर सरांची लेखक म्हणून नवीन ओळख आपणास होत आहे. सह्याद्रीच्या कुशीत आणि अरबी समुद्राच्या सानिध्यात वसलेले कोकणाची वैशिष्ट्ये भूगोलातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी लेखक भाऊराया चौधर बालभारती भूगोलाचे पाठ लेखन करत आहे. त्यांचे लिखाणाचे आणि पुस्तक प्रकाशनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कोट्यावधी विद्यार्थ्यांना या भूगोल पाठ्यपुस्तकाचा फायदा होणार असल्याने त्यांच्या या अथक प्रयत्नांचा सर्व जिल्हापरिषद शाळांना सार्थ अभिमान आहे.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३०/२०२६ अकोले दि. १७/०६/२०२६
तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. मंगल दत्तु पिचड, रा. पिंपरकणे,** ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे आजे सासरे कै. बळवंता पांडु पिचड यांचा मृत्यू दि. २०/०२/१९७२** रोजी **मौजे पिंपरकणे** येथे झाला असुन त्यांच्या **वडीलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय पिंपरकणे**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. मंगल दत्तु पिचड, रा. पिंपरकणे,** ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांचे आजे सासरे कै. बळवंता पांडु पिचड यांचा मृत्यू दि. २०/०२/१९७२** रोजी **मौजे पिंपरकणे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय पिंपरकणे,** ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/०६/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# महाजन यांच्या आश्वासनानंतर वर्षा आंदोलन स्थगित

- शनिवारी तोडगा न निघाल्यास मुख्यमंत्री निवासस्थानासमोर रिंग रोड बाधित शेतकऱ्यांचा आक्रमक एल्गार – करण गायकर



नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक तालुक्यातील रिंग रोड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' शासकीय निवासस्थानासमोर होणारे आंदोलन मंत्री गिरीश महाजन यांनी दिलेल्या सकारात्मक आश्वासनानंतर मंगळवार,दि.३० जून २०२६ पर्यंत स्थगित करण्यात आले आहे. मात्र,शनिवारी होणाऱ्या उच्चस्तरीय बैठकीत ठोस निर्णय झाला नाही,तर ३० जून रोजी वर्षा निवासस्थानासमोर शेकडो रिंग रोड बाधित शेतकरी आक्रमक लोकशाही आंदोलन करतील,असा इशारा छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी दिला. आज मुंबई नाका येथील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पवित्र स्मृतिस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याच ठिकाणाहून मुख्यमंत्री निवासस्थानावरील आंदोलनाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. दरम्यान,नामदार गिरीश महाजन यांचे स्वीय सहाय्यक संदीप जाधव तसेच नासिक पोलीस उपायुक्त काळे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन करण गायकर व रिंग रोड बाधित शेतकऱ्यांशी चर्चा केली.त्यानंतर त्यांनी दूरध्वनीद्वारे मंत्री गिरीश महाजन यांच्याशी शेतकऱ्यांची थेट चर्चा घडवून आणली. यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले की,येत्या शनिवारी रिंग रोड प्रकल्पासंदर्भात उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

या बैठकीस संबंधित मंत्री, आमदार, खासदार, जिल्हाधिकारी, एमएसआरडीसी, नगररचना विभाग, जिल्हा प्रशासन तसेच मंत्रालयातील वरिष्ठ सचिव उपस्थित राहतील. बैठकीत रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या सर्व मागण्यांवर सविस्तर चर्चा करून न्याय्य मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल.



**कोपरगाव :** शिर्डी लोकसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी गेल्या दोन वर्षांत जवळपास ४०० कामांना मंजुरी देण्यात आली असून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच पंतप्रधान सहाय्यता निधीच्या माध्यमातून अतिगंभीर ६६ रुग्णांना एकूण १ कोटी ३७ लाख २३ हजार ५०० रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळवून दिल्याची माहिती खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली.

## थोडक्यात बातम्या...

### व्हाईस चेअरमनपदी रंगनाथ देशमुख यांची बिनविरोध निवड



श्रीगोंदा (स. गांवकरी) : तालुक्यातील शिरसगाव बोडखा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी रंगनाथ बाळासाहेब देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेवेळी विद्यमान चेअरमन भानुदास सूर्यकांत सोमवंशी यांच्यासह संचालक प्रकाश सोमवंशी, जुबेर सय्यद, राहूल सोमवंशी, शिवाजी लगड, संभाजी गायकवाड, संभाजी धारकर, वाल्मिक दळवी, शांताबाई उबाळे, संजय उबाळे, अलका सोमवंशी, पुष्पलता सोमवंशी तसेच सोसायटीचे सचिव भाऊसाहेब निंभोरे उपस्थित होते. रंगनाथ देशमुख यांच्या निवडीबद्दल सूर्यकांत सोमवंशी, बाळासाहेब सोमवंशी, डॉ. संतोष देशमुख यांच्यासह ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. सहकार क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाचा सोसायटीच्या प्रगतीसाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### वेंकटेश पोदार लर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांचे संगीत क्षेत्रात उल्लेखनीय यश




श्रीगोंदा (स. गांवकरी) : अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ आयोजित शास्त्रीय गायन व वादन परीक्षेत वेंकटेश पोदार लर्न स्कूल, श्रीगोंदा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या परीक्षेत सिया सचिन हराळ यांनी प्रथम श्रेणी, सारा सचिन हराळ यांनी द्वितीय श्रेणी, तत्सवी प्रफुल्ल आल्हाट यांनी प्रथम श्रेणी, कार्तिकी संतोष पवार यांनी प्रथम श्रेणी, स्वरांजली संतोष दिवटे यांनी विशेष प्राविण्य, तर आराध्या राजेंद्र ढवळे यांनी विशेष प्राविण्य मिळवत यशाची चमकदार कामगिरी केली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संगीत शिक्षक श्री. प्रीतम दुतारे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेचे संचालक मा. श्री. आनंद शहा, शाळा व्यवस्थापन, शिक्षकवृंद आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांची जिद्द, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. संगीत क्षेत्रातील त्यांच्या भावी प्रगतीसाठी शाळेकडून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

### २८ जूनला पल्स पोलिओ लसीकरण; १,८७८ लसीकरण बूथ

ठाणे (स. गांवकरी) : देशाला पोलिओमुक्त ठेवण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला बळकटी देण्यासाठी २८ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी ठाणे जिल्ह्यात व्यापक सूक्ष्म नियोजन (Micro Plan) पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयातून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक पात्र बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लस पोहोचविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील सुमारे १ लाख ९७ हजार ६९४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचा डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी ग्रामीण व शहरी भागात मिळून १ हजार ८७८ लसीकरण बूथ उभारण्यात येणार असून, त्यावर कार्य करण्यासाठी ४ हजार ३४८ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. बूथच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी ३७४ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. लसीकरणापासून एकही बालक वंचित राहू नये यासाठी विशेष घरभेट मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अंदाजे ६ लाख ६९ हजार ७७३ घरांना भेटी देण्यासाठी १ हजार ३४७ पथके कार्यरत राहणार असून, या कामासाठी एकूण ५ हजार ३२३ पथक-दिवसांचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २६३ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले असून, त्यांचे एकूण १ हजार ३६ पर्यवेक्षक-दिवस नियोजित करण्यात आले आहेत. बसस्थानके, रेल्वे स्थानके, तपासणी नाके आणि स्थलांतरित नागरिकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी ६८ ट्रान्झिट पथके कार्यरत राहतील. यासाठी २५७ पथक-दिवसांचे नियोजन करण्यात आले असून २७ पर्यवेक्षक तर दुर्गम आणि विशेष परिस्थितीतील भागांमध्ये ८८ मोबाईल पथके ३१७ दिवसांचे नियोजन करण्यात आले आहे.

### मोहरम उत्सवात 'नवसाचे वाघ' ठरताहेत सामाजिक सलोख्याचे प्रतीक


सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर मध्ये मोहरम चे पंजे सर्वत्र बसविण्यात आले असून या मोहरम उत्सवात 'नवसाचे वाघ' हे सध्या सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरताना सर्वत्र दिसत आहेत. विशेष म्हणजे सोलापूर मध्ये नवसाचे वाघ बनविण्याची पिढ्यान्‌पिढ्यांची परंपरा कायम टिकून राहिली आहे. सोलापूर शहरातील मोहरम उत्सव हा केवळ एक धार्मिक सोहळा नसून सामाजिक सलोखा, श्रद्धा आणि परंपरेचे अनोखे प्रतीक मानला जातो. यंदाही मोहरमच्या दिवसांत शहरात दिसणारे 'नवसाचे वाघ' हे या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरत असून, या माध्यमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे जिवंत दर्शन घडत आहे. शहरातील पूर्व मंगळवार पेठेतील मीठ गल्ली परिसरातील 'बडे मौलाली पंजा सवारी' येथे मोहरमच्या सातव्या आणि आठव्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. येथे सर्वधर्मीय भाविकांना समान प्रवेश दिला जात असल्याने धार्मिक सौहार्दाचे एक सुंदर चित्र पाहायला मिळत आहे. अनेक हिंदू आणि मुस्लिम कुटुंबे आपल्या लहान मुलांना वाघाच्या वेशभूषेत सजवून बडे मौलाली पिरांच्या दर्शनासाठी आणत आहेत.

# आदिवासी पाल्यांची लुटमार कधी थांबणार?

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

आदिवासी भोळ्याभाबड्या समाजाची दिशाभूल करून गोर गरीब पाल्यांकडून शाळा ( एल. सी.)सोडल्याचा दाखला देण्या साठी सरसकट ५००/-रुपये घेणारे श्री संत गाडगे महाराज विद्यालय,अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, जबाबदार संचालक नितीन पाटील यांनी पैसे कोणत्या नियमावलीनुसार घेतले आहेत याचा खुलासा करावा अशी मागणी आदिवासी समाजाचे कार्यकर्ते लोकशाहीर भीमराव ठोंगिरे यांनी घोडेगाव आदिवासी प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांच्याकडे केली आहे.

संबधित मुख्याध्यापक संपत माने यांना या संबंधी फोन केला असता हे पैसे आम्ही काय आजच नाही घेतले प्रत्येक वर्षी घेतो तुम्हाला काय करायचे ते करा अशी



उद्धटपणे उत्तर दिले आहे.आमचे विद्यालयाचे नियम फार कडक आहेत ते तुम्हांला माहित नाही.असो तुमचे नियम व संस्थेत काम गैरप्रकार चालतात या विषयावर सन २००९ ला लोकशाहीर भीमराव ठोंगिरे यांनी मिडीयाच्यामाध्यमा तून जनतेसमोर मांडले आहेत.

इयत्ता दहावीच्या पाल्यांकडून शाळा सोडल्याचा दाखला देण्याच्या नावाखाली हा निधी गोळा करतांना सुरेश गणेश फलके राहणार गोंदेवाडी या निरागस पाल्याला पैसे नाही म्हणून दाखला न देता घरी पाठवले पैसे घेऊन आल्यावरच दाखला मिळेल हि संबंधितांची भाषा अनुदानित प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळेत चारशे ते पाचशे विद्यार्थी निवासी आहेत त्यांना तर पैसे घेतल्याची पावतीच दिली नाही.

त्यानंतर मुख्याध्यापक श्री थोरात यांच्याशी संपर्क साधला असता आमचे पावती पुस्तक संपले होते म्हणूनपावती दिली नाही अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जाते भोळ्याभाब ड्या आदिवासी समाजाची दिशाभूल करून लुटमार करणाऱ्या शैक्षणिक संस्थेच्या विरोधातआदिवासी पालकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जनसेवक लोकशाहीर भिमराव ठोंगिरे या द्वारे गाडगे महाराज मिशन मुंबई यांना विनंती केली की गाडगे महाराज संस्थेत शिक्षण घेणाऱ्या पाल्यांकडून अवैध सरसकट घेतलेले पैसे पाल्यांना परत करावे गेल्या अनेक वर्षांपासून देणगी स्वरुपात ही लुटमार सुरू आहे लोकशाहीर स्वतःच आश्रम शाळेत शिकलेला माजी विद्यार्थी आहे त्यामुळे आम्ही काय भोगले आहे ते आम्हालाच ठाऊक आहे.पुढच्या पिढीला तरी त्यांच्या मुलभूत सुविधा पासून वंचित ठेवू नका आमची अवस्था आई जगू देईना बाप भिक मागू देईना आणि संचालक देणगी घेतल्याशिवाय संस्थेत थांबू देईना.

> आदिवासी मुलामुलींचे शिक्षण केंद्र आश्रमशाळा,
> समाज पाहून भोळा संचालकांनी फुलवलाय मळा। खोट्या
> मायेचा जिव्हाळा,तोंडचा घास ओढून खाण्या उतावळा।। फक्त
> अनुदानासाठी कळवळा, अंतरी विद्यार्थीचा राग। आदिवासी बांधवा
> जाग,दाखल्यासाठी दिलेले पैसे परत माग।। आपला ऋणी शाहीर..!
> जय सदगुरू गाडगेबाबा!

# बुलेट ट्रेनची दिशा अक्कलकोटकडे; विकासाला नवी गती

अक्कलकोट : (स. गांवकरी)

मुंबई–हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे अक्कलकोट तालुक्याच्या विकासाला नवे पंख मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रकल्पाच्या प्रस्तावित मार्गामध्ये तालुक्यातील सलगर, अक्कलकोट ग्रामीण, हसापूर, हत्तीकणबस, कोन्हाळी, कर्जाळ, चिक्केहळी, निमगाव आणि ममदाबाद या नऊ गावांतील काही जमिनी संपादनाच्या कक्षेत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकीकडे शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत असली, तरी दुसरीकडे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे परिसराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. प्राथमिक माहितीनुसार सुमारे १६५ गट क्रमांकांचा समावेश करण्यात आला असून जवळपास ९८० शेतकरी या प्रक्रियेमुळे प्रभावित होऊ शकतात. अंतिम अधिसूचना, संयुक्त मोजणी आणि हरकतींची सुनावणी पूर्ण झाल्यानंतरच बाधित क्षेत्राचे निश्चित चित्र स्पष्ट होणार आहे. प्रस्तावित मार्गात खासगी शेतीसोबतच शासकीय जागा, वन विभागाच्या जमिनी, ग्रामपंचायत मालमत्ता, रस्ते, नाले, तलाव आणि नदी क्षेत्राचाही काही भाग समाविष्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विविध विभागांना जमीन हस्तांतरण प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. श्री स्वामी समर्थांच्या पवित्र भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अक्कलकोटला या प्रकल्पाचा मोठा लाभ होऊ शकतो. देशातील प्रमुख शहरांशी वेगवान संपर्क निर्माण झाल्याने भाविक आणि पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. परिणामी पर्यटन, हॉटेल, लॉजिंग, वाहतूक, व्यापार आणि सेवा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळेल.

# उत्तर तालुक्यातील वडाळा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर

सोलापूर : (स. गांवकरी)

उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्यात आले आहे. दक्षिण सोलापूर चे आमदार सुभाष देशमुख यांनी सतत केलेल्या पाठपुरावा मुळे हे यशस्वी काम पूर्ण झाले आहे.

दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी नागरिकांच्या सोयीसाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून मौजे वडाळा येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. या संदर्भात आमदार सुभाष देशमुख यांनी महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अधिकृत पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. पत्रामध्ये उत्तर सोलापूर तालुक्यातील सुमारे ३५ गावांतील नागरिकांना शेती, जमीन वाटप, जन्म-मृत्यू नोंद, विविध दाखले तसेच महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी शहरातील तहसील कार्यालयात जावे लागत असल्याने मोठी गैरसोय होत असल्याचे नमूद करण्यात आले होते. प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर विचार होऊन राज्यात



नव्याने ६९ अप्पर तहसील कार्यालये निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली, त्यामध्ये वडाळा येथील कार्यालयाचाही समावेश करण्यात आला आहे. या निर्णयामुळे उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकरी, नागरिक आणि ग्रामस्थांची महसूल विभागातील कामे अधिक जलद, सुलभ आणि स्थानिक पातळीवर होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आमदार सुभाष देशमुख यांनी नागरिकांना शासनाच्या सेवा त्यांच्या जवळ उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील,असे सांगितले.

# 'त्या' दुष्काळी गावांची पाण्याची प्रतीक्षा संपली

## डी.वाय. ०४ वितरण व्यवस्थेच्या कामाचा मार्ग मोकळा!

कोपरगाव : (स. गांवकरी)

उत्तर नगर व नाशिक जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गावांना निळवंडे धरणाचे पाणी मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या निळवंडे कालवा कृती समितीच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. जलसंपदा विभागाने डी.वाय. ०४ उजवी व डावी वितरण व्यवस्थेच्या चारीचे डिझाइन मंजूर केल्याने बहादरपूर, सायाळे तसेच परिसरातील अनेक गावांच्या शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

निळवंडे कालवा कृती समितीचे अध्यक्ष रूपेंद्र काळे व कार्याध्यक्ष गंगाधर रहाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संगमनेर येथील जलसंपदा विभागाकडून डी.वाय. ०४ वितरण व्यवस्थेचे काम अद्याप सुरू झाले नव्हते. याबाबत समितीने सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर सी.डी.ओ. मेरी, नाशिक येथील अधिकाऱ्यांनी संबंधित चारीचे डिझाइन मंजूर झाल्याची माहिती दिली. त्यामुळे आता या कामास प्रत्यक्ष सुरुवात होण्याचा मार्ग




मोकळा झाला आहे.

निळवंडे कालवा कृती समितीने गेल्या अनेक वर्षांपासून उत्तर नगर व नाशिक जिल्ह्यातील सात तालुक्यांतील १८२ दुष्काळी गावांना निळवंडे धरणाचे पाणी मिळावे यासाठी विविध स्तरांवर संघर्ष केला. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या माध्यमातून केंद्रीय जल आयोगाच्या आवश्यक मान्यताही मिळविण्यात आल्या. उर्वरित मंजुरीसाठी समितीने औरंगाबाद उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या सुनावणीनंतर न्यायालयाने कालव्याचे काम निश्चित मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर विविध अडचणींवर मात करत अखेर ३१ मे २०२३ रोजी निळवंडे लाभक्षेत्रातील बहुतांश गावांना धरणाचे पाणी सोडण्यात आले. तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील तसेच माजी खासदार प्रसाद तनपुरे यांच्या प्रयत्नांतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने हा प्रकल्प गतीमान झाला होता. मात्र जवळके, धोंडेवाडी, बहादराबाद, शहापूर, बहादरपूर तसेच सिन्नर तालुक्यातील सायाळे, पाथरे, मलढोण आदी गावांपर्यंत पाणी पोहोचले नव्हते.

या गावांसाठी डी.वाय. ०४ वितरण व्यवस्थेचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी निळवंडे कालवा कृती समितीचे कार्याध्यक्ष गंगाधर रहाणे, तानाजी शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे गुरुजी, भाऊसाहेब शिंदे आदींनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली होती. अखेर या मागणीला यश मिळाले असून डिझाइन मंजूर झाल्याने प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.

दरम्यान, उर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या मुख्य कालव्यांवरील उर्वरित ६३ हजार १८१ हेक्टर लाभक्षेत्र पी.डी.एन. (पाईप वितरण प्रणाली) द्वारे सिंचनाखाली आणण्यासाठी ऑक्टोबर २०२४ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. संबंधित कामे प्रगतिपथावर असताना डी.वाय. ०४ वितरण व्यवस्थेच्या मंजुरीमुळे या परिसरातील सिंचन व्यवस्थेला आणखी बळ मिळणार आहे.

याशिवाय संगमनेर तालुक्यातील चिंचोली ग्रामपंचायत हद्दीतील पश्चिमेकडील सुमारे ३०८ हेक्टर क्षेत्र वगळण्यात आले होते. या क्षेत्राचा समावेश करण्यासाठीही निळवंडे कालवा कृती समिती सातत्याने पाठपुरावा करत असून संबंधित प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. ग्रामपंचायतीशी चर्चा करून मागील पंधरवड्यात तेथील कामही पुन्हा सुरू करण्यात आले असल्याची माहिती समितीने दिली.

# शिर्डी मतदारसंघात ४०० विकासकामांसाठी कोट्यवधींचा निधी

## ६६ रुग्णांना १.३७ कोटींची मदत – खा. भाऊसाहेब वाकचौरे!

कोपरगाव : (स. गांवकरी)

शिर्डी लोकसभा मतदार संघातील विविध विकासकामांसाठी गेल्या दोन वर्षांत जवळपास ४०० कामांना मंजुरी देण्यात आली असून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच पंतप्रधान सहाय्यता निधीच्या माध्यमातून अतिगंभीर ६६ रुग्णांना एकूण १ कोटी ३७ लाख २३ हजार ५०० रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळवून दिल्याची माहिती खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली. आपल्या कार्यकाळातील विकासकामांबाबत काही इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध



झालेल्या वृत्तांचे खंडन करताना खा. वाकचौरे म्हणाले की, १३५ विकासकामांसाठी १४.७० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्यातील बहुतांश कामे प्रगतीपथावर आहेत. निधी मंजूर झाल्यानंतर कामे पूर्ण होण्यासाठी आणि खर्च नोंदविण्यासाठी ठरावीक कालावधी लागतो. त्यामुळे निधी अखर्चित असल्याचा दावा दिशाभूल करणारा आहे. नगर-मनमाड महामार्गाच्या उन्नतीकरणासाठी सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची तरतूद व्हावी यासाठी आपण लोकसभेत सातत्याने पाठपुरावा केला. तसेच विविध रेल्वे प्रकल्प, पायाभूत सुविधा आणि जनहिताच्या विषयांवरही केंद्र सरकारकडे मागणी लावून धरली असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी खासदार असताना संसदेत ७८० हून अधिक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून देशातील सक्रिय खासदारांमध्ये स्थान मिळविले होते, असेही त्यांनी नमूद केले. पंतप्रधान सहाय्यता निधीअंतर्गत मतदारसंघातील अनेक गरजू रुग्णांना मदत मिळवून देण्यात आली आहे. कोपरगाव तालुक्यातील ९ रुग्णांना २४ लाख ४७ हजार ५०० रुपये, नेवासा तालुक्यातील १४ रुग्णांना ३८ लाख ५० हजार रुपये, राहता तालुक्यातील ८ रुग्णांना २२ लाख २५ हजार रुपये, संगमनेर तालुक्यातील १५ रुग्णांना ४१ लाख ८८ हजार रुपये, श्रीरामपूर तालुक्यातील १८ रुग्णांना ४१ लाख ३४ हजार ५०० रुपये, अकोले तालुक्यातील एका रुग्णाला २ लाख ६२ हजार ५०० रुपये आणि पुण्यातील एका रुग्णाला ३ लाख रुपयांचे सहाय्य मिळवून देण्यात आले आहे. या सर्वांची एकूण मदत १ कोटी ३७ लाख २३ हजार ५०० रुपये इतकी आहे.

पंतप्रधान सहाय्यता निधीचा लाभ मिळविण्यासाठी संबंधित रुग्णालय केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त पॅनलवर असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी खा. वाकचौरे यांनी मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळा, व्यायामशाळा, सभामंडप, विविध रस्ते आणि इतर विकासकामे प्रगतीपथावर असल्याचा दावा केला. ही कामे लवकरच पूर्णत्वास जातील. तसेच राज्यात आणि केंद्रात एकाच विचारांचे सरकार असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघाच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> "शिर्डी मतदारसंघातील मंजूर कामांचा निधी टप्प्याटप्प्याने खर्च होतो. अनेक कामे सध्या सुरू असून त्यांचा खर्च अंतिम नोंदीत अद्याप दिसत नाही. त्यामुळे निधी अखर्चित असल्याचा दावा चुकीचा आहे. डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून विकासकामांना आणखी गती देणार आहोत."
> **— खा. भाऊसाहेब वाकचौरे, शिर्डी लोकसभा मतदारसंघ.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)